PRACTICE PAPER FOR MARATHI
PAPER-1

## SECTION A-GRAMMAR

१) पुढील वाक्ये कंसातील सूचनाप्रमाणे बदलून लिहा. ५

१)त्यांनी माझ्याकडून त्या पत्राचे उत्तर लिहून घेतले. (वर्तमानकाळ करा)

२)माझी पुतणी डॉक्टर झाली याचा मला अभिमान वाटतो. (भविष्यकाळ करा)

३)पुस्तके बहुमोल असून तप्त मनाला समाधान देतात. (भूतकाळ करा)

४)वरगात मुले दगा करत आहेत. (वाक्य शुद्ध करा)

५)ति नेहमी परमेष्वराला हाका मारायचि. (वाक्य शुद्ध करा)

## SECTION B-COMPOSITION

२)तुमच्या विभागातील पोलिस अधिका-यास पत्र लिहून तुम्हाला होत असलेल्या ध्वनीक्षेपकाचा त्रास कमी करण्याची विनंती करा. ८

किंवा

सौर उर्जेच्या पुस्तकाची चौकशी करणारे पत्र पुस्तक विक्रेत्यास लिहा.

३)खालील उतारा वाचून त्याचा एक तृतीयांश सारांश लिहा. ७

हास्यवदनाची थोरवी फारच थोडया लोकांना कळते.नीतीमान असावे असा उपदेश आपल्या कानीकपाळी नित्य होत असतो.पण माणसाने नेहमी सुहास्यवदन असावे, असे कोणी कोणाला सांगताना दिसून येत नाही.तसेच म्हटले तर कट्टर कर्मठ माणसापेक्षा नेहमी हसतमुख असणारा मनुष्य अधिक योग्य असला पाहिजे.सकाळ संध्याकाळ चार चार घटका जपजाप्य करणारा माणूस, जेवणापूर्वी देवदर्शानाची अभिलाषा करणारा माणूस नेहमी आंबट चेहरा करून राहत असेल, आजुबाजूंच्या माणसांवर खेकसत असेल व प्रत्येक माणसावर चिरचिर करीत असेल, तर त्याच्या धर्ममार्तंडत्वामुळे समाजाचे व त्याचे काय कल्याण होईल? उलट सदा हसतमुख असणारा मनुष्य केवळ आपल्या सन्निध्याने लोकांच्या दु:खाने गारठलेल्या अंतःकरणात तो आशेची ऊब निर्माण करील.आधीच जग हे कडू गोर्ष्टींनी, अनुभवांनी भरलेले आहे.कडू दृश्य पाहायचे असले तर माणसाने आपली नजर कोठेही फिरवली तरी दृष्टीस पडेल.अनंत संकटांनी, व्याधींनी व यातनांनी गांजलेल्या या जगात दु:खी कष्टी चेह-याचा अंधार सर्वत्र भरलेला आाहे.हास्याचे सूर्यकिरण या जगात दूर्मिळ आहेत.ते किरण जेथून प्रसूत होतात त्या चेह-याचे पावित्र्य शेकडो धर्मक्षेत्राहून अधिक समजले पाहिजे.

४)खालीलपैकी एका शीर्षकावर कथा लिहा १०

१)अतिलोभाचे फळ

२)एकीचे बळ

३)हुशार कोल्हा

## SECTION C-COMPREHENTION

५) खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

कमळाजवळ अलिप्तता हा गुण आहे.पाण्यात असून ते पाण्यावर राहते.चिखलात असून ते चिखलाच्या वर फुलते.कमळ अनासक्त आहे.ईश्वर, करूण व अकर्ता असे आपण वर्णितो.हया सर्व जगाचा पसारा तो चालवतो.परंतु अनासक्त रीतीने हा पसारा तो चालवीत आहे.

कमळामध्ये अलिप्तता आहे.तसाच दुसरा गुण म्हणजे वाईटातूनही चांगले घेऊन स्वतःचा विकास करून घ्यावा हाही गुण आहे.चिखलातूनही रमणीयत्व ते घेते.रात्रंदिवस तपस्या करून आपले हृदय मकरंदाने कमळ भरून ठेविते.सुगंधाने भरून ठेविते.सूर्याकडे त्याचे तोंड असते.प्रकाश पाहताच ते फुलते.प्रकाश जाताच ते मिटते.प्रकाश म्हणजे कमळाचा प्राण.कमळ प्रकाशोपासक आहे. तशी भारतीय संस्कृती प्रकाशोपासक आहे.'तमसो मा ज्योतिर्गमय' ही भारतीय संस्कृतीची आरती आहे.

कमळ शतपत्र आहे.सहस्त्रपत्र आहे.शंभर पाकळया, हजार पाकळया काही कमळांना असतात.भारतीय संस्कृती ही सुद्धा शतपत्रांची आहे.शेकडो जातीजमाती, अनेक वंश, अनेक धर्म, अनेक पंथ, यांच्यातून सार घेऊन ती वाढत असते.एकेक नवीन पान ती जोडते.भारतीय संस्कृतीचे कमळ अद्याप पूर्ण फुललेले नाही.ते फुलत आहे.विश्वाच्या अंतापर्यंत ते फुलत राहील.भारतीय संस्कृती अनंत पाकळयांचे कमलपुष्प होईल.

प्रश्नः

१.कमळाच्या ठिकाणची अलिप्तता स्पष्ट करा. २

२.कमळास प्रकाशोपासक का म्हटले आहे? २

३.'तमसो मा ज्योतिर्गमय' याचा अर्थ २

अ)प्रकाशाकडून अंधाराकडे जा
ब)अंधाराकडे ज्योती घेऊन जा
क)अंधाराकडून प्रकाशाकडे जा

४.भारतीय संस्कृती शतपत्रांची आहे असे म्हणण्याची कारणे कोणती? २

५.वरील उता-यास योग्य शिर्षक दया. २

## SECTION D-LITERATURE

६)खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा १५

१)जांभळाच्या झाडाविषयी कोणत्या आठवणी लेखकाने सांगितल्या आहेत?
२)हरिहरराव सोनुले यांना कोणत्या गोष्टींची आवड होती?
३)आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती?
४)घराकडे पाहून ज्योत्स्ना कदम यांना उदास का वाटू लागले?
५)प्लेगच्या साथीत सावित्रीबाईनी कोणते काम केले?

७) अ)खालील कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर एका वाक्यात लिहा २

१)वाणीने कशासाठी शस्त्र व्हावे?
२)कशाला अंकुर फुटू नये असे कवीला वाटते?
३)कवी पंचप्राण कशासाठी देणार आहे?

ब)खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे उत्तर थोडक्यात लिहा ३

१)आत्मसन्माने जगण्यासाठी कवीने कोणता मार्ग सांगितला आहे?
२)अंधार पखाली या कवितेत कवीने कोणती अपेक्षा व्यक्त केली आहे?
३)श्रमिकांनी काया करावे असे कवीला वाटते? का?

क)खालीलपैकी कोणत्याही दोन संदर्भाचे स्पष्टीकरण करा. १0

१."ज्योत ज्योतीने जागवा करा प्रकाश सोहळा"

२."साखरपेरणी न ये कामा"

३."यावी लाविता कपाळी भक्तिभावनाने माती"

८) अ)अंगठा या कथेतून कोणता बोध होतो? ६

ब)'या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या एक कुटुंबिय आहेत' असे प्रीतम का म्हणतो? ४